दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ रविवार, २९ मार्च २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३४७ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# उद्योग परवानग्यांमध्ये सुलभतेसोबत महाराष्ट्रात वीजदरातही टप्प्याटप्प्याने घट होणार – मुख्यमंत्री

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** महाराष्ट्रात उद्योग सुलभतेसाठी परवानगी प्रक्रियेत मोठे बदल करण्यात आले असून 33 परवानग्यांपैकी 20 परवानग्या स्व-प्रमाणनावर (Self Certification) आणण्यात आल्या आहेत. उर्वरित 13 परवानग्यांची संख्याही लवकरच कमी करण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रामकी ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज आणि एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने ‘बल्क ड्रग पार्क’ व ‘लाइफ सायन्सेस हब’ उभारण्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, उद्योग प्रधान सचिव डॉ. पी.अन्बळगन, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते.




मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्योजकांना विश्वासपूर्वक सांगितले की, राज्यातील वीजदर पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने कमी होणार आहेत. सध्या असलेला ₹10.88 प्रति युनिट हा वीजदर पुढील पाच वर्षात ₹15.87 पैसे इतका न होता कमी होऊन ₹9.97 पर्यंत येणार असून 2028-29 पर्यंत महाराष्ट्र देशातील सर्वात कमी वीजदर असलेले राज्य ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला.

उद्योगांना सुलभ वातावरण देण्यासाठी ‘मैत्री पोर्टल’ला सर्वसमावेशक अधिकार देण्यात आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मैत्री पोर्टलमुळे एकाच ठिकाणी सर्व परवानग्या मिळणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवत प्रत्येक अर्जाचा मागोवा घेता येणार असून, ठराविक कालावधीत सेवा न दिल्यास संबंधित यंत्रणांवर कारवाईची तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

हरित व शाश्वत पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात येणार असून कॉमन इफ्ल्युएंट ट्रीटमेंट प्लांट (CETP), सर्क्युलर इकॉनॉमी आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करून उद्योगांना ‘ग्रीन’ बनविण्याचा प्रयत्न होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या प्रकल्पात एमएसएमई उद्योगांनाही प्रोत्साहन देण्यात येणार असून मोठ्या उद्योगांसोबत त्यांच्या पुरवठादारांनाही सवलती देण्याची शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शासन आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीत जागतिक दर्जाची, परवडणारी आणि स्पर्धात्मक उद्योग परिसंस्था निर्माण करण्यावर भर दिला जाणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

राज्यातील औद्योगिक धोरण अधिक गतिमान करत “नो नॉनसेन्स बिझनेस इज अवर स्ट्रॅटेजी इन बिझनेस” ही भूमिका घेत स्थिर व पारदर्शक वातावरण निर्माण करण्याचा शासनाचा निर्धार आहे. या उपक्रमातून महाराष्ट्र देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर स्पर्धात्मक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

## झेप फाउंडेशन पुणे,व पर्वती नागरिक कृती समितीतर्फे महिला दिनानिमित्त आदर्श माता सन्मानपत्र वितरण संपन्न

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** 27 मार्च रोजी पुणे येथील पद्मावती नगर मधील पद्मावती मंदिर मध्ये झेप फाउंडेशन पुणे व पर्वती नागरिक कृती समितीच्या वतीने कर्तुत्वान महिलांचा सन्मान करण्यात आला यावेळी पर्वती नागरिक कृती समितीच्या अध्यक्षा श्रेया फाटक तसेच ज्येष्ठ सेने नाट्य कलावंत जयमाला इनामदार ह भ प चारुता दत्तप्रसाद शहाणे दत्तप्रसाद शहाणे गायक तसेच झेप फाउंडेशन पुणे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष , युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र प्रदेश सहसचिव, अजिंक्य महाराष्ट्र न्यूज चॅनल प्रतिनिधी, पत्रकार कांताभाऊ राठोड , तानाजी शिरोळे रोकडोबा मंदिर देवस्थान विश्वस्त शिवाजीनगर







गावठाण पुणे,व सामाजिक कार्यकर्ते .शेखर कोरडे ,सामाजिक कार्यकर्ते संजय कारंडे आदी मान्यवर उपस्थित होते त्यांच्या हस्ते समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माता-भगिनी पूजा घाटकर, अरुंधती बद्दी, श्रेया संजय फाटक, अलका रामचंद्र कांबळे, आशा करजगीकर, संगीता पाटील ,वैशाली खटावकर ,रजनी मोरे, मेघना कवठेकर, स्मिता सबनीस ,शारदा सरोदे, उज्वला सुनील चिनके, कल्पना दीपकसिंह बिसेन ,लीला रंगनाथ खैरे ,सुप्रिया तांबट, संगीता प्रदीप नाईक , वैशाली संजय कारंडे,जयश्री प्रभू देसाई ,ह. भ .प चारुता दत्तप्रसाद शहाणे ,रोहिणी काळे, अशालता काळे, माधवी जगताप जयमाला प्रकाश इनामदार, प्रणिता कांबळे ,अंजली कुलकर्णी ,ज्योतीताई ढमढेरे यांना आदर्श माता व विविध क्षेत्रातील सन्मानपत्र वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये दत्तप्रसाद शहाणे यांनी भक्ती गीत सादर केले तसेच जयमाला इनामदार यांनी गाढवाचा पाळणा सादर केला.

## जिरापूरे (खेरडा) ता. कारंजा (लाड) येथील गाजलेल्या खून (Murder) प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठचा मोठा निकाल

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी अब्दुल जुबेर :** जिरापूरे (खेरडा) ता. कारंजा (लाड) येथे घडलेल्या बहुचर्चित खून प्रकरणात दिनांक २७ मार्च २०२६ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी आरोपींना जामीन मंजूर करत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

सदर गुन्हा हा पोलीस स्टेशन कारंजा (शहर), जिल्हा वाशीम येथे क्राईम क्रमांक ०४/२०२५ अन्वये नोंदविण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३(१), ७४, ७५ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. यास अनुसरून भारतीय दंड संहिता (IPC) मधील समतुल्य कलमे म्हणजे ३०२ (खून), ३५४ (स्त्रीच्या लज्जेचा भंग करण्याचा प्रयत्न) व ३४ (सामायिक हेतू) अशी आहेत

या प्रकरणात आरोपी म्हणून संदीप रामभाऊ गायकवाड व किशोर उर्फ बाबू देवराव कोवे यांची नावे समोर आली होती. दिनांक ०३ जानेवारी २०२५ रोजी गावालगतच्या गायरान परिसरात एका विवाहित महिलेचा धारदार शस्त्राने खून झाल्याची गंभीर घटना घडली होती. या घटनेमुळे जीरापूरे (खेरडा) तसेच कारंजा (लाड) परिसरात मोठी खळबळ उडाली होती व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते

सदर गुन्हा सुरुवातीला अज्ञात व्यक्तीविरुद्ध नोंदविण्यात आला होता. त्यानंतर तपासादरम्यान विविध साक्षीदारांचे जबाब, कथित हेतू व परिस्थितीजन्य पुरावे यांच्या आधारे आरोपींना अटक करण्यात आली. दोघेही आरोपीतर्फे एडवोकेट हसीब मिर्ज़ा यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे जामीन अर्ज दाखल केला होता.



या जामीन अर्जावर सुनावणीदरम्यान बचाव पक्षाचे वकील ॲड. हसीब मिर्ज़ा यांनी अत्यंत सखोल अभ्यास, कायदेशीर बारकावे आणि तर्कशुद्ध युक्तिवाद यांच्या जोरावर न्यायालयासमोर भक्कम बाजू मांडली. प्रकरणातील साक्षीदारांचे उशिरा नोंदवलेले जबाब, तपासातील त्रुटी, तसेच जप्ती व कथित शस्त्रसापडीत असलेले विसंगतीपूर्ण मुद्दे त्यांनी ठळकपणे मांडले.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून उपलब्ध पुराव्यांचा विचार केला असता, केवळ परिस्थितीजन्य पुरावे आरोपींना थेट गुन्ह्याशी जोडण्यासाठी अपुरे असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. तसेच तपास पूर्ण होऊन आरोपपत्र दाखल झाल्यामुळे आरोपींना जामीन देणे योग्य ठरेल असे मत नोंदविण्यात आले. या निकालामध्ये ॲड. हसीब मिर्ज़ा यांच्या अभ्यासपूर्ण तयारी, कायद्यावरील प्रभुत्व आणि प्रभावी मांडणीची विशेष दखल घेण्यात येत आहे. त्यांच्या सक्षम पैरवीमुळेच आरोपींना जामीन मिळाल्याची चर्चा कायदा वर्तुळात आणि स्थानिक परिसरात होत आहे.

## जिल्हा स्काऊट मेळाव्यात यावर्डीच्या विद्यार्थ्यांना कमावली 4 पारितोषिके

**(यावर्डीच्या बारा विद्यार्थ्यांचा सहभाग, चार स्पर्धेत बक्षीसे, स्काऊट गाईड प्रदर्शनात प्रथम क्रमांक,2019 ला उत्कृष्ट जिल्हा मेळाव्याच्या आयोजनाबद्दल शाळेच्या सत्कार)**

महाराष्ट्र जीत

**कारंजा तालुका प्रतिनिधी-** सौ. सुशीलाताई जाधव विद्यालय सोनखास, वाशिम येथे 24 मार्च रोजी 12 व्या जिल्हा स्काऊट गाईड मेळाव्याचे आयोजन शिक्षण विभाग जिल्हा परिषद वाशिम, स्काऊट गाईड कार्यालय जिल्हा वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. सुशीलाताई जाधव विद्यालय सोनखास, वाशिम येथे करण्यात आले होते.या जिल्हा मेळाव्यामध्ये आयोजित विविध स्पर्धेत बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डीच्या विद्यार्थ्यांनी स्काऊट गाईड प्रदर्शन मध्ये प्रथम क्रमांकासह चार बक्षिसे प्राप्त केलेत.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डी येथील बारा विद्यार्थी शाळेचे मुख्याध्यापक विजय भड व स्काऊट मास्टर गोपाल काकड यांच्या मार्गदर्शनात जिल्हास्तरीय मेळाव्यात सहभागी झाले होते. यामध्ये वंश हिम्मत आडोळे, पवन मथुरदास वडेकर, ओम सुरेश कोपरकर, रुद्र नवनाथ डुकरे, अमन राजू वासे, सुजल निलेश भोयर, प्रियांशू विद्याभूषण वासे, प्रथमेश सुनील भागवत, संस्कार अतुल करडे, आदित्य रवींद्र इंगळे, तन्मय सतीश रिठे, अजिंक्य गजानन चव्हाण यांचा सहभाग होता. स्काऊट गाईड जिल्हास्तरीय बाराव्या मेळाव्याच्या उद्घाटन व समारुकीय बक्षिस वितरण प्रसंगी योजना शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजेंद्र महाजन, स्काऊटचे जिल्हा संघटक के.एल. पवार, सौ. सुशिलाताई जाधव विद्यालयाचे प्राचार्य श्रीकांत जोशी, विवेकानंद विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब गोटे, पंडित नेहरू विद्यालयाचे प्राचार्य गिरी, जगदंबा विद्यालय भामदेवीचे मुख्याध्यापक रवींद्र राठोड, वसंत विद्यालय पोहा प्राचार्य विठ्ठल भुसारे, जय बजरंग विद्यालय सुकंडा चे मुख्याध्यापक सुमेध तायडे, विदर्भ माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे सहसचिव विजय भड आदी मान्यवर उपस्थित होते. सदर विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मेळाव्यात आयोजित विविध स्पर्धेत सहभाग नोंदवला, त्यापैकी स्काऊट गाईड प्रदर्शनी या स्पर्धेत या विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तसेच बँड पथक स्पर्धेत द्वितीय क्रमांक, शेकोटी कार्यक्रमातील ऑपरेशन सिंदूर या समूहनृत्याला द्वितीय क्रमांक आणि पथक संचलन स्पर्धेमध्ये प्रोत्साहन पर बक्षीस अशाप्रकारे बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथील स्काऊट पथकातील विद्यार्थ्यांनी चार पारितोषिके प्राप्त केलीत. समारोपिय कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बारा विद्यार्थी त्यांचे स्काऊट शिक्षक गोपाल काकड व मुख्याध्यापक विजय भड यांचा स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच दर चार वर्षांनी आयोजित होणाऱ्या नॅशनल जांबोरी, लखनऊ येथे सहभागी झालेल्या शाळेचे स्काऊट शिक्षक गोपाल काकड यांचा व 2019 मध्ये शाळेने उत्कृष्ट जिल्हा मेळाव्याचे आयोजन केल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक विजय भड यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.शाळेने मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष योगेश खोपे व सचिव हरिदास गंद्रे व इतर संचालक तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## गोरेगाव येथे चैत्र नवरात्री अष्टमी निमित्त विशेष ललिता सहस्त्रनाम कुंकूमार्चन सेवा संपन्न

महाराष्ट्र जीत

**मुंबई,(केतन भोज) :** नागरी निवारा परिषद,गोरेगाव पूर्व येथे अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ आध्यत्मिक विकास व बालविकास केंद्र,(दिंडोरी प्रणित ) यांच्या वतीने नागरी निवारा परिषद,प्लॉट नं.६,गणेश मंदिर



येथे,चैत्र नवरात्री अष्टमी निमित्त विशेष ललिता सहस्त्रनाम



कुंकूमार्चन सेवा मोठया उत्साहात संपन्न झाली.यावेळी असंख्य महिलानी त्यांच्या कुलदेवीचा टाक,फोटो,मूर्ती वर कुंकूमार्चन करून कुलस्वामिनीचा आशीर्वाद घेतला.रामनवमी निमित्ताने समुहिक रामरक्षा व हनुमान चालीसा पठण विशेष सेवा करण्यात आली.ज्येष्ठ सेवेकरी सुनील पडवळ व श्रीधर कडू यांच्या मार्गदर्शनाखाली वरील सेवा खूप उत्साहात पार पडली.

## विराहीत ते अकोला मार्गे पातूर नंदापूर एस टी बस सेवा सुरु

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा :** प्रवाशांच्या सोयीसाठी असलेली एसटी महामंडळ बस सेवा गेली चार पाच वर्षे विराहीत साठी बंद होती . मात्र दि . 23 मार्च2026 पासून विराहीत ते अकोला मार्गे पातूर नंदापूर पूर्ववत सुरू झाली आहे . वृत्त असे की विराहित येथील सामाजीक कार्यकर्ते भाऊराव राऊत यांनी प्रयत्न करून अकोला ह्या जिल्ह्याचे ठिकाणी ये जा करण्यासाठी



बस सेवा मिळावी करीता प्रयत्न केलेत .त्यानुसार नवीन बसस्थानक अकोला येथून बोरगांव , पातूर नंदापूर, कानडी मार्गे विराहित अशी मुक्कामी एस टी बस सेवा सुरू करण्यात आली आहे.या बस मुळे विराहितला लागून असलेल्या धानोरा पाटेकर,राजूरा घाटे येथील प्रवाशांची सोय झाली असल्याने प्रवाश्यानी आनंद व्यक्त केलाआहे.तसेच अकोला दोनद पिंजर घोटा मार्गे विराहित मुक्कामी बस सेवा गेली आठ दहा महिने पासून बंद आहे.या मार्गे सुद्धा दिवसा सकाळी अकोला 8 वाजता व सायं . चार वाजता दोन फेऱ्या सुरू केल्या तर विराहित, कानडी,घोटा,मोझर येथील प्रवाशांना सोईचे होवू शकते . तेव्हा सदर मागणीचा आगर प्रमुखांनी विचार करून एसटी बससेवा सुरु करावी अशी प्रवाशी जनतेनी विनंती केली आहे .

दैनिक
# महाराष्ट्र जीत
रविवार, २९ मार्च २०२६



## संपादकीय

### जातिभेद नष्ट करण्यास शोषकांचाच विरोध

देशात हिंदुत्वाचा डंका वाजत असताना या जातिभेदाचे बळी हे हिंदूच ठरत आहेत. तरीही जातिभेद नष्ट व्हावा अशी पुसटशी इच्छाशक्ती या शोषकांमध्ये दिसत नाही.

विद्यापीठातील जातिभेदाचे बळी, रोहित वेमूला आणि पायल तडवी यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या अर्जानंतर, मागास जातीच्या विद्यार्थ्यांवर विद्यापीठांमध्ये जातिभेदातून होणारे अत्याचार रोखले जावेत, समता सुनिश्चित होण्यासाठी नियम बनवावेत, या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 'यूजीसी इक्विटी रेग्युलेशन २०२६' अस्तित्वात आले. त्यास खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी तीव्र विरोध केल्याने सर्वोच्च न्यायालयानेच त्या नियमांवर स्थगिती आणली आणि इथल्या शोषक वर्गाचाच जातिभेद नष्ट करण्यास पराकोटीचा विरोध आहे, हे कटू वास्तव पुन्हा एकदा अधोरेखित झाले. हे विधान आणि लेखाचे शीर्षक कोणास अतिशयोक्त वाटू शकेल. परंतु, हे वास्तव नाकारता येत नाही की अनुसूचित जाती, जमातींना (आणि ओबीसींना देखील) न्याय, प्रतिनिधित्व देण्यासाठी, समता स्थापित करण्यासाठी जेव्हा सरकारद्वारा उपाय योजले जातात त्या प्रत्येक उपायास शोषक वर्ग प्रखर विरोध करतो किंवा सदोष अंमलबजावणी करून ते उपाय कुचकामी कसे ठरतील हे पाहतो. याची सुरुवात संविधान आल्यापासून आणि आरक्षण लागू झाल्यापासून झाली आहे. त्यावर एक दृष्टिक्षेप.

देशातल्या ब्राह्मणवादी व्यवस्थेत अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांवर हजारो वर्षांपासून अमानवी अन्याय, अत्याचार केले जात आहेत याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंदोलनांनी देशाला आणि संविधान सभेला करून दिली होती. या अत्याचारपीडित लोकांना, न्याय, प्रतिनिधित्व, प्रतिष्ठा देण्यासाठी, समता स्थापित करण्याकडे एक पाऊल टाकण्यासाठी आरक्षण आले. परंतु जातिभेदाचा समाजावर लागलेला कलंक दूर करण्यासाठी या छोट्या संधीचा उपयोग करून घेण्याऐवजी शोषक वर्गाकडून यास प्रखर विरोध सुरू झाला.

संविधानाने आरक्षण दिले तरी ते राबवण्याची सूत्रे व्यवस्थेत ठाण मांडून बसलेल्या शोषक जातींच्या लोकांकडे होती आणि आहेत. मागास जातीच्या लोकांमध्ये गुणवत्ता असूच शकत नाही, असा ठाम गैरसमज करून घेऊन आणि या लोकांनी पायरीतच समरस होऊन राहिले पाहिजे यासाठी शक्य तिथे शोषक वर्गाने अडवणुकीचे धोरण राबवले. राखीव जागा न भरणे, मुलाखतीत किंवा मौखिक परीक्षेत कमीत कमी गुण देणे. लेखी परीक्षा, मुलाखत, नियुक्तीची पत्रे वेळेत पोहोचू शकणार नाहीत हे पाहणे, इत्यादी मार्गाने नोकरीत प्रवेश कठीण केला जातो. त्यातूनही जे कोणी नोकरी मिळवतील त्यांना अजिबात सहकार्य न करणे, योग्य मार्गदर्शन-प्रशिक्षण न देणे, एखाद्या प्रकरणात अडकवणे, वाईट गोपनीय अहवाल देणे आणि पदोन्नती मिळणार नाही हे पाहणे, यासाठी शोषक वर्ग बुद्धी आणि वेळ खर्च करीत आहे. गेल्या काही वर्षांत तर सरकारी क्षेत्राचे खासगीकरण, कंत्राटीकरण करून आणि आऊटसोर्सिंगच्या मार्गाने या क्षेत्रातील रोजगाराच्या संधीच नाममात्र करून ठेवल्या आहेत.

विशेष म्हणजे, हा भेदभाव या शोषकांनी चक्क परदेशात देखील स्थलांतरित करून देशाचे आणि धर्माचे नाव बदनाम केले. काही वर्षांपूर्वी अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीत काम करणाऱ्या मागास जातींच्या सहकाऱ्यांचा शोषक जातीच्या सहकाऱ्यांनी छळ केल्याची अनेक प्रकरणे उजेडात येऊ लागली. त्यावेळी मागास जातीच्या लोकांना न्याय देण्यासाठी कॅलिफोर्निया राज्यावर, एक विधेयक मंजूर करून जातीवर आधारित भेदभाव हा बेकायदेशीर गुन्हा ठरवण्याची वेळ आली. विशेष म्हणजे अमेरिकेत नोकरीस जाणारे तरुण हे उच्च शिक्षित असतात, त्यांनी तिकडच्या अवघड प्रवेश परीक्षा पास केलेल्या असतात आणि गुणवत्तेत सरस ठरल्यावरच त्यांची निवड होते. तरीही शोषक जातीचे लोक जातीयता सोडत नाहीत.

# रिपाई आठवलें पक्षाचा बुलडाणा जिल्हा संवाद दौरा; रिपाई पक्षवाढीसाठी कामाला लागा

**बाबासाहेब जाधव/ बुलडाणा,(प्रतिनिधी ) :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले पक्षाचा बुलडाणा जिल्हा मध्ये पक्ष संघटन वाढीसाठी संवाद दौरा सुरु आहे. या दरम्यान जेष्ठ नेते स्मृतीशेष त्यागमुर्ती नागोराव गुरूजी यांचे सुपुत्र आणि बुलडाणा जिल्हाचे रिपाइं आठवले यांचे एकनिष्ठ जिल्हाध्यक्ष स्मृतीशेष देवीदासजी साबळे यांचे निर्भीड पॅन्थर वारसा असलेले, एकनिष्ठेने चालनारे,आंबेडकरी विचारांशी, रिपाई पक्षाशी लहान पणापासून जुळलेले असे जिल्हा संपर्क प्रमुख बाबासाहेब जाधव संवाद बैठक दौरा दरम्यान यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करतांना सांगितले की ज्यांच्या रक्तातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत असे कार्यकर्ते आंबेडकरी चळवळ पुढे नेण्यासाठी सदैव तयार असतात. ज्यांना विविध पदाची लालसा असते मात्र डॉ.रामदासजी आठवले साहेब यांनी मला दिलेली जबाबदारीं महत्वाची असून पक्षनिष्ठा महत्वाची आहे. 50 वर्ष ज्यांच्या पक्ष निष्ठेचे कुंकु कपाळी लावून 50 वर्ष रिपाई आठवलेचा निळा झेंडा खांद्यावर घेऊन पक्ष वाढविणारे व डॉ.रामदासजी आठवले यांचा विचार जनमानसा पर्यंत पोहोचवीण्याचा उद्देश समोर ठेवून जिल्हा दौरा सुरू केला आहे.

लोकनेते रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार डॉ. रामदासजी आठवले यांच्या आदेशाने कार्यकर्त्यांच्या संवाद बैठका सुरु केल्या असून मला कुठल्याही पदाची अपेक्षा नसून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या खुल्या पत्रावर स्थापन झालेल्या एकमेव रिपब्लिकन पक्षाच्या वाढीसाठी अहोरात्र



शेवट पर्यंत झटणार असल्याचा निर्धार केला आहे.

आमडापूर तालुका चिखली येथील आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते नरहरी दादा गवई यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना बाबासाहेब जाधव म्हणाले की,माझ्या वडीलांनी 14 आक्टोंबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नागपूरच्या दिक्षाभूमीवर दर्शन घेऊन शिक्षकी पदाचा राजीनामा दिला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया याचा झेंडा हाती घेऊन शेवटच्या श्वासापर्यंत प्रचार आणि प्रसार केला.आज माझी मुलगा, सुन जागतिक निष्णात डॉक्टर

असून अमेरिकेतील उच्च पदावर वैद्यकीय सेवा देत असतांना मला माझे जीवन आरामात जगता आले असते परंतु माझ्या वडिलांचा आंबेडकरी विचारांचा वारसा घेऊन डॉ.रामदासजी आठवले साहेबांच्या रिपाईचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून शेवटपर्यंत,कीतीही कठीण प्रसंग आले व कीतीही त्रास सोसावा लागला तरी कार्य करीत राहणार आहे.

रिपाई पक्षाला येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पक्ष संघटना मजबूत करून पक्ष वाढविण्यासाठी गाव तेथे शाखा व घर तेथे कार्यकर्ता अभियान

द्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतलेला विचार व डॉ. रामदास आठवले साहेबांनी कार्यकर्त्यांना दिलेला आदेश आता थांबू नका चला संघटित व्हा रिपाइं आठवलें पक्षाच्या निळया झेंड्याखाली एकत्र येऊन शासनकर्ती जमात बना असे विचार बाबासाहेब जाधव यांनी यावेळी मांडले यावेळी जेष्ठनेते समाजभूषण प्रा. इंजि.भैयासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब सरदार, बुलडाणा जिल्हा महीला अध्यक्षा वंदनाताई वाघ, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप काकडे, जिल्हा कार्यध्यक्ष प्रा.मुक्तार पठाण सर,जिल्हा अल्पसंख्याक आघाडीचे प्रमुख नबाब मिर्झा बेग, जिल्हा युवाध्यक्ष प्रकाशदादा म्हस्के पाटील, जिल्हा संघटक संपर्क प्रमुख इंजि.शरद खरात, जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब वानखडे, विदर्भ प्रदेश सचिव विजय सपकाळ,जिल्हा सचिव विजय साबळे सर्वश्री तालुकाध्यक्ष चिखली हीम्मतराव जाधव, बुलढाणा केशवराव सरकटे, मोताळा बाळासाहेब आहीरे, सिंदखेडराजा भानुदास शेजूळ, विजय भालमोडे यांच्यासह बहूसंख्य रिपाई पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## शाळा व्यवस्थापन च्या अध्यक्षपदी योगीनाथ रोडे, उपाध्यक्षपदी ज्योती पाटील अविरोध



**अशोकराव उपाध्ये / कारंजा लाड:** कारखेडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा च्या घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये शाळा व्यवस्थापनचे अध्यक्षपदी योगीनाथ नामदेव रोडे तर उपाध्यक्षपदी ज्योती विवेकानंद पाटील यांची अविरोध निवड करण्यात आली .

दि २७ रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कारखेडा येथे पालक सभा बोलावण्यात आली होती, शाळा व्यवस्थापन समिती चा कार्यकाळ संपल्याने नव्याने समिती गठीत करण्यासंदर्भात पालक सभा पूर्ण झाली होती, चर्चा करण्यात आली त्यामध्ये संपूर्ण समिती चे सदस्य निवडण्यात आले सदस्य निवडण्यात आले, सदस्य निवडी नंतर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपदी योगिनाथ नामदेव रोडे तर उपाध्यक्षपदी ज्योती विवेकानंद पाटील यांच्या नावावर एकमत करण्यात आले, व निकषानुसार समिती गठीत करण्यात आली त्या मध्ये जया संतोष खंडागळे, मंगला गणेश झडके, रुपेश रामहरी वारेकर, रामदास नर्सिंग जाधव, किरण संदीप मोरे, विजय भीमराव ढोले, माया निलेश पिंगाणे, शुभांगी मंगेश ढोके , मनोज किशोर तायडे , यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली, यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रामपंचायत सदस्य बबन देशमुख, मुख्याध्यापक समीर देशमुख,विषेश शिक्षक पुथ्वीराज आडे ,गीतांजली मोरे, कविता चौधरी, अंगणवाडी सेविका शारदा मात्रे , यांची उपस्थिती होती .

## अखिल नारी शक्ती वस्ती विकास संस्था (रजि), घाटकोपर महाराष्ट्र यांच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**घाटकोपर, (केतन भोज) :** समाजातील गरीब, गरजू महिला, रस्त्यावरील मनोरुग्ण, बेवारस नागरिक, अन्यायग्रस्त व बेरोजगार महिलांच्या उन्नतीसाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या अखिल नारी शक्ती वस्ती विकास संस्था (रजि), घाटकोपर महाराष्ट्र यांच्या वतीने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रविवार, दि. 22 मार्च रोजी सायंकाळी 6 वाजता काजुटेकडी, घाटकोपर (पश्चिम) येथील श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे हा कार्यक्रम पार पडला. संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा व समाजसेविका संगिता सूर्यकांत मांडे यांच्या नेतृत्वाखाली तसेच खजिनदार रंगिता पवार व सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



यावेळी सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, कला, क्रीडा व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच विविध विषयांवर उपस्थित महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाग समिती अध्यक्षा व नगरसेविका अश्विनी मते यांच्यासह सुरेखा गवळी, कांचन बढे, आशा कोरडे, कांचन साळवी, रेहाना शेख, सविता चाकणे, सोनल शिंदे, तनुजा सोनवणे, उज्वला पवार, पद्मा, प्रतीक्षा शिंदे, अश्विनी इंदुलकर, नंदा गव्हाणे, सरिता डाकरे, संजय निर्मळे, महेंद्र आर. चौधरी, अरविंद जोशी, आशा कांबळे, साजिद अन्सारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच विभागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्व मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## कारंजा येथे एमआयएमतर्फे तहसीलदारांना निवेदन कोणत्याही नागरिकावर अन्याय होऊ न देण्याची मागणी

**प्रतिनिधी अब्दुल जुबेर :** विशेष पुनरावलोकन (एस आयआर) संदर्भात कोणत्याही नागरिकावर अन्याय होऊ नये, या मागणीसाठी २८ मार्च रोजी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन ( एमआयएमच्या) वतीने कारंजा तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. एमआयएमचे प्रदेश उपाध्यक्ष मो. युसुफ पुंजानी यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद उपाध्यक्ष ॲड.फिरोज शेकुवाले,शिक्षण सभापती जाकीर शेख, आरोग्य सभापती अनिस खान, नियोजन सभापती नदीम अहमद, ॲड. सुभान खेतीवाले, इरफान खान, नगर सेवक इमरान पारेख, इर्शाद पहिलवान, अब्दुल एजाज,



युनुस पहलवान, नगरसेवक सलमान विराणी, ॲड. मिलिंद खंडारे, मुन्ना ठेकेदार, अमन शाह, रमजान पप्पूवाले, रहमत ठेकेदार, अब्दुल नईम, तसेच सर्व सभापतींच्या नेतृत्वाखाली एमआयएमचे सर्व नगर परिषद सदस्य यावेळी उपस्थित होते. यावेळी नायब तहसीलदार लक्ष्मण बनसोडे व नायब तहसीलदार विनोद हरणे यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत विशेष पुनरावलोकन प्रक्रियेत कुणावरही अन्याय होणार नाही, असे स्पष्ट आश्वासन दिले. तसेच कोणताही मतदान स्तर अधिकारी (बीएलओ) योग्यरीत्या काम करत नसल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व आवश्यक असल्यास प्रथम माहिती अहवाल (एफआयआर ) देखील नोंदवला जाईल, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, नायब तहसीलदार बनसोडे यांनी विशेष पुनरावलोकन संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. तर नायब तहसीलदार हरणे यांनी अपंग व्यक्तींचे प्रमाणपत्र, स्मार्ट ओळखपत्र तसेच आपल्या ग्राहकाची ओळख पडताळणी (केवायसी ) प्रक्रियेबाबत उपस्थितांना माहिती देऊन मार्गदर्शन केले. या निवेदनामुळे संबंधित विषयावर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याचे दिसून आले असून, नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी एमआयएम पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## घाटटेक फाट्यावरील प्रवासी निवारा ऑक्सिजनवर

**प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही :** सारकिन्ही, येथून जवळ असलेल्या घाटटेक फाट्यावरील प्रवासी निवाऱ्याची दयनीय अवस्था झाली आहे महान ते पिंजर भेंडी माला ते जनुना या चौफुलीवरील घाटटेक फाटा येथील प्रवासी निवाऱ्याची दयनीय अवस्था झाली आहे टेंभी भेंडी महाला हातोला भेंडगाव वडाळा जनुना या गावातील प्रवासीला चांगल्या प्रकारे प्रवासी निवारा नसल्यामुळे या परिसरातील प्रवासी या प्रवासी निवाऱ्यामध्ये न बसता बाहेरच उन्हामध्ये उभे राहतात कारण या प्रवासी निवाऱ्याची खूपच दयनीय अवस्था झाली आहे या प्रवासी निवाऱ्यामध्ये प्रवासी बसायला सुद्धा घाबरतात कारण या प्रवासी निवाऱ्याची काहीच गॅरंटी नाही कधी कोसळेल अंगावर यांची गॅरंटी नसल्यामुळे परिसरातील प्रवासी बाहेरच उन्हामध्ये उभे राहतात उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे तसेच लग्नसराई



असल्यामुळे या घाटेक फाट्यावर प्रवासींची खूप गर्दी असते त्यामुळे या घाटटेक फाट्यावरील प्रवासी निवाऱ्याची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी या परिसरातील गावातील प्रवासी करीत आहे घाटटेक फाट्यावरील प्रवासी निवाऱ्याची दयनीय अवस्था झाली आहे त्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे प्रवाशांना बसची प्रतीक्षा करताना त्रास होऊ नये यासाठी प्रवासी निवारे बांधण्यात आले आहेत या प्रवासी निवाऱ्याला अंदाजे वीस ते पंचवीस वर्षांपूर्वी बांधण्यात आले होते महान ते पिंजर भेंडी माला ते जमुना या चौफुलीवरील रस्त्यावरील घाटटेक फाटूयावर प्रवासी निवारा नवीन बांधण्यात यावी अशी मागणी या परिसरातील जनुना भेंडी महाला सारकिन्ही हातोला टेंभी भेंडगाव प्रवासी करीत आहे घाटटेक फाट्यावरील प्रवासी निवाऱ्याची गेल्या अंदाजे 20 ते 22 वर्षांपूर्वीपासून दयनीय अवस्था झाली आहे त्यामुळे प्रवाशांना उन्हाळा पावसाळा बसची प्रतीक्षा करताना त्रास सहन करावा लागत आहे घाटटेक फाट्यावरील प्रवासी निवारा कधी कोसळेल याची शक्यता नाही तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन घाटटेक फाट्यावर नवीन प्रवासी निवारा बांधण्यात यावी अशी मागणी परिसरातील प्रवासी करीत आहे,

**घाटटेक फाट्यावरील प्रवासी निवाऱ्याची खूपच अवस्था खराब असल्यामुळे या प्रवासी निवाऱ्यामध्ये बसण्याची भिती वाटते कधी अंगावर कोसळेल याची गॅरंटी नाही**

**प्रवासी बि,यु,सारकिन्ही**

**जनुना येथुन घाटटेक फाटा तिन कि,मी, आहे अकोला जाण्यासाठी वाहानाची वाट पाहत या प्रवासी निवाऱ्यामध्ये बसावे लागते परंतु हे प्रवासी निवारा अंगावर कोसळण्याची भिती वाटते म्हणून आम्ही उन्हाळ्याचे दिवस असुन शुद्धा बाहेर च बसतो**

**प्रवासी चंद्रशेखर राठोड जनूना**

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रेयदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# ठाणे जिल्हा वृत पत्र लेखक संघाचा 34 वा वर्धापन दिन

ठाणे जिल्हा तसे पाहिले तर दुर्गम भागच होय. पूर्वी १३ तालुके होते. त्यामध्ये दोन तालुक्यांची भर पडल्याने एकूण १५ तालुके उदयास आले. परंतु वाढती लोकसंख्या पहाता. ठाणे जिल्ह्याचे विभाजन 1ऑगष्ट 2014 साली करण्यात आले. आणि ठाणे जिल्ह्याचे दोन जिल्हे झाले एक ठाणे तर दुसरा पालघर जिल्हा झाला. या मध्ये ठाणे जिल्ह्यात सात तालुके आणि पालघर जिल्ह्यात आठ तालुके येतात पूर्वी दोन्ही जिल्हे एकत्र होते या मुळे प्रशासकीय सुविधा आणि लोकसंख्येचा भार कमी व्हावा हाच उद्देश होता.

त्या वेळी दोन्ही जिल्हे एकत्र असल्याने वाडा, जव्हार, मोखाडा, डहाणू इ, ठिकाणी जायचे म्हणजे तारेवरची कसरत होती. शिवाय त्या वेळी पाहीजे अशी वहानाची साधने नव्हती. पत्राद्वारे संपर्क करीत असत. आणि पत्रलेखकांचे पत्ते शोधून त्याला आम्ही सभासद करीत होतो.

परंतु पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिली नाही.ठाणे जिल्हा जरी नांवारुपाला आलेला असला तरी शहरी भाग वगळता आजही ग्रामीण भाग हवा तसा विकसित झालेला नाही. तरीसुध्दा शहरी आणि ग्रामीण भागाचे नाते टिकून आहे. उलट ते दृढ होत चालले आहे. याला कारण म्हणजे आता ठाणे जिल्हा औद्योगिक प्रगत झाला आहे. तसेच संपर्काचे साधन व माध्यम होय. पूर्वीचा ठाणे जिल्हा म्हणजे या जिल्ह्याला साहित्यिक,लेखक,सामाजिक,धार्मिक,ऐतिहासिक असे चतुरस्त्र महत्त्व लाभलेल्या ठाणे जिल्हयाने गेल्या अनेक वर्षात अप्रतिम प्रगती साधली आहे. जिल्ह्यात हजारो शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात अनेक गुणवंत लाभले असून प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या संघटना आहेत. व त्यांचा नांवलौकिकही आहे. परंतु वर्तमानपत्रातून सातत्याने जागल्याची भूमिका बजावणाऱ्या वृत्तपत्र लेखकांची संघटना नव्हती. मनात विचार आला की, मुंबईसारखी नावजलेली वृत्तपत्र लेखकांची संघटना आहे. मग ठाणे जिल्ह्यात का नसावी? आणि पत्रलेखका साठी स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करावा. असा विचार केला. आणि या हेतूने कल्याणमधील ज्येष्ठ पत्रलेखक (पत्रकार) समाजसेवक श्री. दिवाकर गोळपकर, प्रा. उदय सामंत यांनी यासाठी पुढाकार घेतला. वर्तमानपत्रात प्रसिध्द होणाऱ्या निवासी पत्त्याच्या आधारे जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्र लेखकांना आवाहने करून कल्याण येथे एक बैठक घेण्यात आली. त्या बैठकीस प्रा. उदय सामंत, दिवाकर गोळपकर, जैतू मुठोळकर, गजानन माने, मधुकर मुळूक, सुनील झळके, कै डॉ दिलीप धानके, कै मुरलीधर शिर्के विवेक मालसे,विजय चव्हाण मिलिंद पळसुले इ. उपस्थित होते. अशा अनेक बैठकी झाल्या. उन्हा-पावसाची पर्वा न करता प्रत्येक लेखकांच्या घरी गेलो. त्यामध्ये मुरलीधर शिर्के, शांताराम गामणे, लक्ष्मण घागस, कै अरुणकुमार भगत, अरविंद म्हात्रे, सुरेश केणे, रविद्र घोडविंदे दिलीप गडकरी आदिंचा सहवास असायचाच.

बैठकीअंती पाठपुरावा घेतल्यानंतर अखेर ३१ मार्च १९९१ रोजी ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाची रितसर स्थापना केली. . कोणत्याही राजकीय पक्षाची बांधिलकी न ठेवता वृत्तपत्र लेखकांच्या सुप्त गुणांना वाव देणे, संघाच्या माध्यमातून सतत विविध उपक्रम, कार्यक्रम राबविणे हे उद्दिष्ट ठरवूनच, संघाची वाटचाल सुरू झाली.

प्रथमत: आम्ही छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या जीवनचरित्रांवर आधारित निबंध स्पर्धेचे आयोजन केले, त्यास उत्तम



प्रतिसाद लाभला. तसेच सार्वजनिक उपक्रमातील शासकीय, निमशासकीय संस्थांतील कर्मचाऱ्यांना गतीमान करण्यासाठी, प्रशासनात असणारे दोष-अडचणी - उणीवा दूर करण्यासाठी व तमाम जनतेच्या तक्रारी, समस्या संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी, विविध साहित्यिक, पालकमंत्री, जनसंपर्क अधिकारी, लोकप्रतिनिधी आदिच्या कानी घालण्यासाठी 'वार्तालाप, प्रश्नमंजुषा, शिबीर, क्रीडा,शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रातील व्याख्याने, हितगुंज इ कार्यक्रम करू लागलो. तसेच पत्रलेखन, काव्यलेखन. निबंध स्पर्धा, गणेशोत्सव स्पर्धा, विद्यार्थ्यांचा सत्कार इ. उपक्रम राबवून वृत्तपत्र लेखकांचा गौरव केला. त्यामुळे शहरी ते ग्रामीण भागांमधून वृत्तपत्र लेखकांच्यापत्रांची गती दिवसें-दिवस वाढतच गेली. तसेच विविध स्पर्धांचा सहभागही वाढला. 'आज ठाणे जिल्ह्यातील बहुतांशी - सर्वच वृत्तपत्र लेखकांना कोणत्या ना कोणत्या रुपाने पुरस्कार प्राप्त झाले आहेत. एक प्रकारे ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाची चढती कमान, ज़ोरात वाटचाल करीत होती परंतु हे सर्व वीस वर्षांपूर्वी केले. आता ठाणे जिल्हा वृत पत्र लेखक संघ कार्यरत आहे. परंतु काही पत्रलेखक सेवा निवृत्त झाले. तर काही वयोवृद्ध झाले. लिखान करणे शक्य नाही. तरी काही तळमळ करतात. त्या मध्ये सामाजिक कार्य आणि सभासद कमी झाले. तरी आज संघात एक्टिव /धडपडणारे सभासद आहेत.याचा - आम्हाला अतिशय अभिमान वाटतो.

गेल्या तीस वर्षा पूर्वी संघाने भेदभाव न करता धिटाईने असंख्य कार्यक्रम व उपक्रम राबविले. मग ते राजकीय असो की सामाजिक आम्ही आवर्जून बोलावित, त्यामध्ये साहित्यिक लेखक सुध्दा होते. उदा. सुप्रसिध्द नाटककार कै. विद्याधरजी गोखले, गो. रा. खैरनार, खा. नारायण आठवले, ग्राहक चळवळीचे. मधू मंत्री, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे क्रिकेट पंच पिल्लू रिपोर्टर, चंद्रशेखर वाघ, डॉ. भा. व्यं. गिरधारी, दै. सन्मित्रचे संपादक कै स. पां. जोशी, प्रा. वि. चि. फडके, योगेश त्रिवेदी, सुधीर जोगळेकर, पंढरीनाथ सावंत, कै वि. आ. बुवा, पद्माकर कायदे (मंत्रालय),सोमनाथपाटील, सोनावणे, केशव मेश्राम,आनंदराव सुर्यवंशी, प्रा. कै किशोर शांताबाई काळे, तसेच राजकीय गणेश नाईक, प्रा. कै राम कापसे, माजी कामगार मंत्री कै साबीर शेख, कै अनंत तरे, ठाणे,नवी मुंबई, कल्याणचे महापौर,नगराध्यक्ष आदि अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाचे निमंत्रण स्विकारल्याबद्दल आम्हाला अभिमान वाटत असे. . संघाने कार्यक्रमाबरोबर कौटुंबिक, वर्षा सहलीचेही आयोजन केले, आरोग्य शिबीर, श्रमदान शिबीर, भूकंप-पूरग्रस्तांना मदत, कर्णबधीरांना श्रवण यंत्रणे प्रदान केली. दरवर्षी भव्य असा मान्यवरांचा सत्कार समारंभ आयोजित केला जात असे. ठाणे जिल्ह्यातील वृत्तपत्र व्हावा, लेखकांचा परिचय त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून संपादक जेष्ठ पत्रलेखक दिवाकर गोळपकर यांनी समाजमनाचे' प्रतिबिंब हा दिवाळी अंक व पत्रलेखकाचे परिचय अंक काढला. आणि राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा घेऊन विजेत्या स्पर्धकांना समारंभपूर्वक मान्यवरांच्या शिफारसीनुसार बक्षिसे दिली जात होती. तेचं दिवाळी अंक ठाणे, कल्याण, मुंबई, नाशिक कारागृहातही दिले जात.आणि महादेव गोळवसकर यानी राज्य स्तरीय पत्रलेखकाचे अधिवेशन घेण्यासाठी सुचना केली. व मान्य करून तयारीला लागलो. सर्वानी मदत केली. आणि कल्याण मध्ये पत्रलेखकांचे राज्यस्तरीय अधिवेशन ठेवून उत्तम प्रकारे पार पडले. . त्यास प्रतिसाद लाभला

संघाच्या सुरुवातीच्या वाटचालीत प्रा. उदय सामंत, दिवाकर गोळपकर, जैतु मुठोळकर, विजय चव्हाण, कैविजय कळंमकर, महादेव गोळवसकर, बी. एन. वाघ, कै दि. भा. मुंडले, कै मधुसूदन ठोसर, कै मुरलीधर शिर्के, अरविंद, म्हात्रे, रमेश सावंत, नाना म्हात्रे,

कै अरुणकुमार भगत, गुरुनाथ तिरपणकर, अशोक हासे, , सुभाष जैन, परशुराम कोठेकर, उदय वानखेडे, सुनील झळके, केशव पवार, शशिकांत जोशी आदिनी साथ दिली. ती आठवण विसरु शकत नाही. आज या संघात अनेक नवीन सदस्य सामील होत आहेत. संघाची स्थापना झाली तेव्हापासून आम्हाला दैनिक सन्मित्र व दें. जनमत यांनी भरपूर प्रसिध्दी दिली व संघाला प्रसिध्दीच्या झोतात आणले. आमच्या प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहून दै. जनमतचे संपादक तुषार राजे व सन्मित्रकार कै स. पां. जोशी काका यांचे मार्गदर्शन लाभल्याने आम्ही त्याबद्दल त्यांचे ऋणी आहोत.अशी झाली संघाची भरभराट.

सध्या संघ कार्यरत असून संघाचे अध्यक्ष अरविंद म्हात्रे यांनी कौटुंबिक कारणास्तव राजीनामा दिल्याने अजून अध्यक्ष निवड झाली नाही. ती लवकरात लवकर करावी अशी सभासदांचे म्हणने आहे. संघाची मिटिंग गुरुनाथ तिरपणकर तीन वेळा लावल्याने संघात उत्सुकता निर्माण झाली आहे. आज संघात जेष्ठ पत्रलेखक अनंत बोरसे, महादेव गोळवसकर, सुधीर कनगुटकर, सुनील इंगले, गुरुनाथ तिरपणकर, सुभाष जैन इ पत्रलेखन चालू असून संघ सुरू ठेवला आहे याचा सार्थ अभिमान वाटतो. जेष्ठ साहित्यिक व पत्रलेखक आर, एन पिंजारी,सुर्यकांत भंडागे, प्रदीप जोशी, श्री राम मोरे, नाना म्हात्रे, लक्ष्मण सुरोशी, मनोहर गायकवाड, बी डी गायकवाड, सुभाष जैन अशोक हासे, सुधाकर कांबळी, कन्हैया नालगौड, रमेश घरत इ सभासद कार्यरत असून पूर्वी प्रमाणे संघ पुन्हा जोमाने कामाला लागेल.असे मत सभासदांनी या वर्धापन दिनी व्यक्त केले.

विशेष म्हणजे ठाणे जिल्ह्यात एकमेव वृत पत्र लेखक संघ आहे, पस्तीव्या वर्षात संघ वाटचाल करीत असून, या वर्धापन दिनानिमित्त आशा बाळगतो की, संघ पुन्हा पूर्वी सारखा भरभराटीस येऊन अधिक सामाजिक उपक्रम राबविण्यास यश येवो, हीच अपेक्षा व हार्दिक शुभेच्छा धन्यवाद

**जैतू मुठोळकर (पत्रलेखक/पत्रकार)**
**माजी सरचिटणीस ठाणे जिल्हा वृत पत्र लेखक संघ (रजि.)**

# नायक मराठा समाजाचे मुंबई अध्यक्ष सुभाष पवार यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई पवार यांचे निधन

**घाटकोपर,केतन भोज :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे घाटकोपर पश्चिम विधानसभा प्रमुख तसेच नायक मराठा समाजाचे मुंबई अध्यक्ष सुभाष गणपत पवार यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई गणपत पवार यांचे वयाच्या 90 व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी 26 मार्च 2026 रोजी रात्री 10 वाजता पोलादपूर तालुक्यातील अडावळे खुर्द येथील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला.

लक्ष्मीबाई पवार यांच्या पश्चात दोन मुले व तीन मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे पवार कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून परिसरातही हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांचे दहावे विधी 4 एप्रिल 2026 रोजी तर तेरावे विधी 7 एप्रिल 2026 रोजी त्यांच्या राहत्या घरी अडावळे खुर्द या गावी होणार आहे. उत्तर कार्याच्या दिवशी श्री संत मोरे माऊली सांप्रदायाचे अधिष्ठानधीपती गुरुवर्य दादा महाराज मोरे माऊली यांचे कीर्तन होणार असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे.

सुभाष गणपत पवार हे गेली चार दशके शिवसेना ठाकरे पक्षात कार्यरत असून त्यांचे बंधू बाळकृष्ण पवार हे प्रसिद्ध वक्ते, प्रवचनकार व कीर्तनकार म्हणून ओळखले जातात. लक्ष्मीबाई पवार यांच्या निधनाच्या दिवशी राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.



# वाशिम येथे महाड सत्याग्रह स्मृती व्याख्यानमालेची यशस्वी सांगता

## महाड सत्याग्रह स्मृती व्याख्यानमाला संपन्न

**वाशिम(प्रतिनिधी) :** स्थानिक येथे दिनांक 19 व२० मार्च 2026 रोजी करण्यात आले होते.ही व्याख्यानमालेचे यावर्षी १५ व्या वर्षात पदार्पण झाले आहे. दि. 19 मार्च 2026 रोजी उद्घाटक म्हणून मा.आ. किरणराव सरनाईक शिक्षक आमदार अमरावती विभाग हे होते तर अध्यक्षस्थानी प्रा. संजय खडसे उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा हे होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा. ऋषिकेश कांबळे, यांनी "डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला माणसात आणलं आपण शुद्धीवर आहोत काय?या विषयावर अभ्यासपूर्वक विचार मांडले





प्रमुख पाहुणे म्हणून मा.विलास खिल्लारे सेवानिवृत्त प्रकल्प संचालक जी.प.वाशिम, मा. सचिन दत्तात्रेय खरात प्राचार्य नवोदय विद्यालय वाशीम हे उपस्थित होते. द्वितीय पुष्प दिनांक 20 मार्च 2026 रोजी अध्यक्ष म्हणून मा. प्रतिभाताई रामप्रभू सोनोने ह्या होत्या तर प्रमुख व्याख्याते म्हणून अँड. वैशाली डोळस यांनी "भारतीय लोकशाही पुढील आव्हाने" या विषयावर आपले विचार मांडले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ एस. के. उंडाळ, डॉ. विजय कानडे बालरोग तज्ञ, मा.गजानन पडघन, महिला व बालविकास अधिकारी वाशिम हे उपस्थित होते या व्याख्यानमालेच्या आयोजनाकरिता अँड.पी. पी. अंभोरे ,हरिश्चंद्र पोफळे,महेंद्र ताजने,दिलीप गवई, विलास भालेराव ,एस. पी. चौरे ,प्रा मधुकर बनसोड, किसन ह. राजे पंढरी खिल्लारे, अरविंद उचित, भीमराव सावळे ई. परिश्रम घेतले.

# राम टेकाळे यांची नागपूर ग्रामीण पोलिसमध्ये निवड

**प्रदीप पोटफोडे/केकत जळगाव :-** भगवान बाबा माध्यमिक विद्यालय, केकत जळगाव येथील माजी विद्यार्थी राम परमेश्वर टेकाळे यांची नागपूर ग्रामीण पोलिस दलात निवड झाली आहे. एसईबीसी प्रवर्गातून टॉपर ठरत त्यांनी हे यश संपादन केले आहे.

राम टेकाळे यांनी गेल्या तीन वर्षांपासून सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रम करत ही यशाची शिखरे गाठली. चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी स्पर्धा परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केली असून त्यांच्या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




त्यांच्या या यशाबद्दल खासदार संदिपान भुमरे, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजुनाना भुमरे, आमदार विलास भुमरे, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य शिवराज भुमरे, प्रगतशील शेतकरी ज्ञानदेव वने, तसेच मुख्याध्यापक संतोष सव्वाशे, रघुनाथ जाधव, बाळासाहेब बोबडे, कल्याण सोनवणे, विष्णू टोपे, थोरे, राठोड व शेळके यांनी अभिनंदन केले आहे.राम टेकाळे यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

# मोखाडा तालुक्यातील मोऱ्हांडा या गावात जागतिक महिला दिन उत्सहात साजरा'

**दयानंद शिंदे :** 'दीपक फाउंडेशन'च्या 'संगाथ' प्रकल्पांतर्गत, २० मार्च २०२६ रोजी मोऱ्हांडा गावात महिला दिनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ५४ लाभार्थी महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती सोनाली पाटील यांची उपस्थिती लाभली; तसेच ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका आणि आशा सेविकाही याप्रसंगी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर एका समन्वयिकेने स्वागत गीत सादर केले, ज्यामुळे संपूर्ण वातावरणात आदरयुक्त आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. त्यानंतर 'संगाथ' प्रकल्पाच्या वरिष्ठ प्रकल्प समन्वयक कु. अश्विनी दाते यांनी उपस्थितांना



संबोधित केले. त्यांनी कार्यक्रमाचा मुख्य उद्देश स्पष्ट करताना महिला सक्षमीकरण, विविध शासकीय योजनांविषयी जागृती आणि सामूहिक सहभागाचे महत्त्व या बाबींवर विशेष भर दिला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात कृषी क्षेत्रातील महिलांची भूमिका, स्वावलंबन आणि विविध शासकीय उपक्रमांद्वारे उपलब्ध होणाऱ्या संधी यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात 'अनुभव कथन सत्रा'चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लाभार्थी महिलांनी आपल्या वैयक्तिक कथा, त्यांना भेडसावलेली आव्हाने आणि मिळवलेले यश यांविषयीचे अनुभव कथन केले; ज्यामुळे इतर सहभागी महिलांनाही नवी प्रेरणा मिळाली. समन्वयकांनीही आपल्या प्रत्यक्ष कार्यक्षेत्रातील अनुभव उपस्थितांशी वाटून घेतले आणि महिलांना विकासकामांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रम अधिक रंजक आणि आनंददायी करण्यासाठी 'म्युझिकल चेअर', 'बलून हिट' आणि 'तळ्यात-मळ्यात' यांसारख्या मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये सर्व महिलांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. या खेळांमधील विजेत्यांचे कौतुक करण्यात आले आणि त्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी, सहभागी महिलांच्या सहभागाचे कौतुक म्हणून त्यांना प्रेमाची छोटीशी भेटवस्तू (स्मृतिचिन्ह) देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम पार पडला, ज्यामध्ये प्रमुख पाहुण्या, उपस्थित मान्यवर आणि कार्यक्रम यशस्वी व अविस्मरणीय करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व लाभार्थी महिलांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला नाशिक पोलीस आयुक्त साहेब महिलेस जीवे ठार मारण्याच्या हेतूने बेदम मारहाण पीडित महिलेस न्याय मिळेल का ?

## न्याय न मिळाल्यास आरोपींना अटक न झाल्यास वंचित बहुजन महिला आघाडी करणार जोरदार आंदोलन, उर्मिला ताई गायकवाड महिला जिल्हाध्यक्ष

महाराष्ट्र जीत

**नाशिक रोड प्रतिनिधी :** नाशिकच्या जेलरोड परिसरात आर्थिक वादातून महिलेस बेदम मारहाण झाल्याची धक्कादायक धक्कादायक घटना समोर आली आहे या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वायरल झाल्यामुळे नाशिक जिल्ह्यात खळबळ उडाली आहे समीना अलाउद्दीन शेख वय वर्ष 32 राहणार शिवाजीनगर माळी कॉलनी यांचे संशयित आरोपी सोबत काही वर्षापासून आर्थिक व्यवहार सुरू होते नोकरी लावून देण्याच्या आमिषाने पैशाची देवाण-घेवाण झाल्याची माहिती समोर येत आहे मात्र व्यवहार पूर्ण न झाल्याने दोघांमध्ये वाद निर्माण झाला या वादातून आरोपी तीन ते चार जणांसह घटनास्थळी येऊन समीना शेख यांना जबर मारहाण करण्यात आली याप्रसंगी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती परंतु मदतीस कोणीही धावून न आल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे दरम्यान एक महिला बेशुद्ध पडल्याची ही माहिती समोर येत आहे नोकरीचे आमिष दाखवून मुस्लिम समाजाच्या महिलेला लाखोचा गंडा घालण्यात आला आहे पैशाची मागणी केली असता तिला जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल होताच सर्व क्षेत्रातून झालेल्या प्रकाराबद्दल तीव्र निषेध व्यक्त



करण्यात येत आहे या घटनेची माहिती मिळताच वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष उर्मिलाताई गायकवाड नाशिक शहर उपाध्यक्ष उषाताई पगारे, मोनिका जाधव भगूर नगर परिषदेचे नगरसेवक अजय वाहने नाशिक जिल्हा उपाध्यक्ष भीमचंद चंद्र मोरे, गोकुळ लोखंडे मयूर पगारे सामाजिक कार्यकर्ते विशाल घेगडमल आधी पदाधिकारी व कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्त्यांनी नाशिक रोड बिटको हॉस्पिटल येथे पीडित महिलेची भेट घेऊन घडलेल्या प्रकाराची माहिती घेतली व लवकरच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक साहेब यांची भेट घेऊन अत्यंत दुर्दैवी व काळीमा फासणारी घटनेचा सविस्तर माहिती देऊन मारेकऱ्यांना ताबडतोब अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करणार आहेत नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला म्हणून एक नवी ओळख झालेली आहे आणि अशा परिस्थितीत नाशिक मध्ये महिलांच्या सुरक्षतेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झालेला आहे झालेल्या घटनेमुळे परिसरामध्ये व महिलांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालेले आहे ही दहशत मोडून काढण्यासाठी सदर आरोपींना व सहभागी असलेल्या गुन्हेगारांना अटक करून कारवाई करावी अशी प्रशासनाकडे महिला जिल्हा अध्यक्ष उर्मिला ताई गायकवाड मागणी करणार आहे तसेच न्याय जर मिळाला नाही तर वंचित बहुजन आघाडी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून न्यायासाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल असे यावेळी सांगण्यात आले. नाशिक रोड पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे परंतु समाधानकारक कारवाई न झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिक संताप व्यक्त करत आहे मारेकरी मोकाट फिरत असून कायद्याचा वचक न राहिल्याची चर्चा परिसरामध्ये होत आहे नाशिक पोलीस आयुक्त या गंभीर घटनेची दखल घेऊन काय कारवाई करतील याकडे संपूर्ण नाशिककरांचे लक्ष लागून राहिले आहे

---

# दिवा शहरात गॅस सिलेंडरचा 'काळाबाजार'? मनसे आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांकडे केली कठोर कारवाईची मागणी

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)ठाणे/ दिवा**: दिवा शहरात घरगुती गॅस सिलेंडर वितरणात मोठा गोंधळ सुरू असून, नागरिकांची उघडपणे लूट केली जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक पवित्रा घेतला असून, दिवा शहर सचिव प्रशांत गावडे यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून संबंधित दोषी गॅस एजन्सींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

दिवा शहरातील अनेक नागरिकांनी तक्रार केली आहे की, गॅस सिलेंडर बुक केल्यानंतर काही दिवसातच कंपनीकडून 'सिलेंडर डिलिव्हर' झाल्याचा संदेश (SMS) मोबाईलवर येतो. मात्र, प्रत्यक्षात ८ ते १० दिवस उलटूनही ग्राहकांना सिलेंडर मिळत नाही . जेव्हा नागरिक एजन्सीकडे विचारणा करतात, तेव्हा त्यांना पुन्हा नवीन बुकिंग करण्यास सांगितले जाते.

एकीकडे आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅसचा तुटवडा असल्याचे भासवले जात असताना, दुसरीकडे कागदोपत्री डिलिव्हरी दाखवून प्रत्यक्षात सिलेंडर गायब केले जात आहेत . हे न दिलेले सिलेंडर काळाबाजारात चढ्या दराने विकले जात असल्याचा दाट संशय मनसेने व्यक्त केला आहे. विशेषतः भारत गॅस कंपनीच्या काही एजन्सींबाबत



PRASHANT PRABHAKAR GAWADE (Secretary - Diva City, Maharashtra Navnirman Sena)

> **"हा प्रकार म्हणजे सामान्य नागरिकांच्या खिशावर मारलेला दरोडाच आहे. ८-१० दिवस सिलेंडर न मिळाल्याने हजारो कुटुंबांचे हाल होत आहेत. प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित एजन्सींचे परवाने तात्काळ रद्द करावेत."**
> **— प्रशांत प्रभाकर गावडे (सचिव, मनसे दिवा शहर)**

तक्रारींचा ओघ मोठा आहे. संबंधित गॅस एजन्सींची तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या दोषी व्यवस्थापकांवर आणि कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. गॅस वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणून नागरिकांना वेळेत सिलेंडर उपलब्ध करून द्यावे.प्रशासनाने या तक्रारीची गंभीर दखल न घेतल्यास मनसे स्टाईलने आंदोलन करण्याचा इशाराही या पत्राद्वारे देण्यात आला आहे. यामुळे दिवा शहरातील गॅस एजन्सींचे धाबे दणाणले आहेत.

---

# अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय वाशीम येथे चक्रवर्ती सम्राट अशोक जयंती उत्साहात साजरी

महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रविण पट्टेबहादुर) :** स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय संतोषी माता नगर वाशीम येथे दि २६ मार्च २०२६ रोजी दुपारी ५ वाजता चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

जयंती कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी अनिल कांबळे होते.तर कवी महेंद्र ताजणे, वंचित बहुजन आघाडी महीला अध्यक्षा ज्योतीताई इंगळे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, सैनिक आनंद पडघान यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांनी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.नंतर वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.त्यानंतर कार्यक्रमांचे अध्यक्ष कवी अनिल कांबळे यांनी सांगितले की,आज देशात आणि देशाबाहेर देखील अराजकता चालू आहे. आणि या वेळेत जगाला युद्ध नको तर बुद्ध हवा आहे.आणि त्याच धर्तीवर चक्रवर्ती सम्राट अशोक यांनी युध्दाला तिलांजली देऊन बुद्धाला शरण येवून बुद्धांचे तत्त्वज्ञान आत्मसात केले आहे.तर महेंद्र ताजणे यांनी सांगितले की, सम्राट अशोक यांचा




इतिहास जर वाचला तर आपल्याला सम्राट अशोकांचे कार्य हे वाशीमच्या इतिहासाला राजे वाकाटकांशी जुळलेले दिसते.आणि ज्योतीताई इंगळे यांनी सांगितले की, सम्राट अशोक हे महान राजे होते.त्यांनी ८४ हजार बौद्ध स्तूप बांधून आणि आपल्या महेंद्र व संघमित्रा या मुलांना प्रदेशात पाठवून बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार केला आहे.एवढेच काय तर सम्राट अशोक हे शुर वीर, पराक्रमी आणि कल्याणकारी राजे होते.आणि त्यांचेच नावाने ओळखले जाणारे अशोक चक्र हे आपल्या देशाच्या तिरंगा वर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले असून त्यांनी विद्यापीठ,दवाखाने, इत्यादीची सुद्धा सोय केलेली आहे.आपण सम्राट अशोक यांचा देखील इतिहास वाचणे जरूरी आहे.कार्यक्रमांचे प्रास्ताविक



व सूत्रसंचालन समाजसेवक राजकुमार पडघान यांनी केले तर आभार प्रदर्शन आर.पी कांबळे यांनी केले.कार्यक्रमाला माधव डोंगरदिवे, उद्धव अवचार, गजानन गुंजकर, अशोक अडागळे, गुणवंताबाई सावदेकर, कमलबाई पडघान, ज्योत्स्ना अवचार, कविता डोंगरदिवे,सारसाबाई पाळेकर,अजय अवचार,ज्ञानबा वंजारी, कैलास सुर्वे, भिमराव सुर्वे, दादाराव भालेराव, विकास वंजारी, संदिप वंजारी, राहूल वंजारी, बाळासाहेब वंजारी, श्रीकांत सुर्वे, बालाजी वाकुडकर व गेंदू सुर्वे यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

---

# भारताची भविष्योन्मुख वाटचाल

महाराष्ट्र जीत

गेल्या काही दशकांमध्ये देशातील वीजमागणी झपाट्याने वाढत आहे. पण जीवाश्म इंधनांवर अवलंबून राहणे दीर्घकालीनदृष्ट्या शक्य नाही. या पार्श्वभूमीवर स्वच्छ, स्थिर आणि दीर्घकालीन ऊर्जा स्रोत म्हणून अणुऊर्जेकडे गंभीरपणे पाहिले जात आहे. म्हणून भारताने अणुऊर्जा क्षेत्रात धोरणात्मक बदल करत 'सस्टेनेबल हार्नेसिंग ॲण्ड ॲडव्हान्समेंट न्यूक्लिअर टेक्नॉलॉजी फॉर इंडिया' (शांती ॲक्ट २०२५) हा महत्त्वाचा कायदा लागू केला आहे.

भारताने अणुऊर्जा क्षेत्रात धोरणात्मक बदल करत 'सस्टेनेबल हार्नेसिंग ॲण्ड ॲडव्हान्समेंट न्यूक्लिअर टेक्नॉलॉजी फॉर इंडिया' (शांती ॲक्ट २०२५) हा महत्त्वाचा कायदा लागू केला आहे. हा कायदा लागू करताना केंद्र सरकारने 'ॲटॉमेटिक एनर्जी ॲक्ट, १९६२' आणि 'सिव्हिल लायबेलिटी फॉर न्यूक्लिअर डॅमेज ॲक्ट २०१०' हे दोन जुने कायदे रद्द करून त्याऐवजी एकसंध आणि आधुनिक कायदेशीर चौकट तयार केली आहे. त्यामुळे अणुऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक, नियमन आणि विकास यांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. भारतातील ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. पुढील दोन-तीन दशकांमध्ये देशातील वीजवापर दुप्पट होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. सौर आणि पवन ऊर्जा यांसारख्या नवीकरणीय स्रोतांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असला तरी त्यांची एक मर्यादा आहे. त्यांची उपलब्धता सतत स्थिर नसते. याउलट अणुऊर्जा हा स्थिर आणि सातत्यपूर्ण वीजपुरवठा करणारा स्रोत आहे. त्यामुळे ऊर्जा मिश्रणात अणुऊर्जेचा वाटा वाढवणे हे भारताच्या दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाचे मानले जाते. सध्या भारताची अणुऊर्जा क्षमता सुमारे ८.७८ गिगावॅट आहे आणि देशातील एकूण वीज उत्पादनात तिचा वाटा सुमारे तीन टक्के आहे. हा वाटा वाढवण्यासाठी सरकारने महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले आहे. २०४७ पर्यंत शंभर गिगावॅट अणुऊर्जा क्षमता निर्माण करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आलेला 'शांती कायदा' हा केवळ कायद्यांचे एकत्रिकरण नसून अणुऊर्जा क्षेत्राच्या संपूर्ण रचनेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.

शांती कायद्याची व्याप्ती तीन प्रमुख स्तरांवर दिसते. त्यात अणुऊर्जा क्षेत्राचे नियंत्रित उदारीकरण, नियामक व्यवस्था मजबूत करणे आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार करणे, यांचा समावेश आहे. यातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे खासगी क्षेत्राला मर्यादित स्वरूपात अणुऊर्जा क्षेत्रात सहभागी होण्याची परवानगी. दीर्घकाळ केवळ सरकारी संस्थांच्या माध्यमातून भारतातील अणुऊर्जा प्रकल्पांचे संचालन होत होते. हे मॉडेल सुरक्षित असले, तरी क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने मर्यादित ठरत होते. नवीन कायद्यामुळे भारतीय खासगी कंपन्या, संयुक्त उपक्रम आणि इतर मान्य संस्थांना अणुऊर्जा प्रकल्प उभारणे, संचालन करणे आणि बंद करणे यासाठी परवाना घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तथापि, काही अत्यंत संवेदनशील क्षेत्रे अजूनही केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालीच ठेवण्यात आली आहेत. त्यात युरेनियम समृद्धीकरण, अणुइंधन पुनर्प्रक्रिया, उच्चस्तरीय अणुकचरा व्यवस्थापन, जड पाण्याचे उत्पादन यांचा समावेश आहे. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित बाबींवर सरकारी नियंत्रण कायम राहणार आहे. या कायद्यामुळे अणुऊर्जा क्षेत्रातील नियमन अधिक स्पष्ट आणि मजबूत करण्यात आले आहे. या अंतर्गत 'ॲटॉमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्ड' या संस्थेला प्रथमच वैधानिक दर्जा देण्यात आला आहे. परिणामी, या संस्थेची स्वायत्तता आणि विश्वासार्हता वाढण्याची अपेक्षा आहे. नवीन कायद्यात परवाने देणे, तपासणी करणे, उल्लंघनांवर कारवाई करणे आणि दंडात्मक कारवाई करणे यासाठी स्पष्ट प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

अणुऊर्जा प्रकल्पांबाबत गुंतवणूकदारांना सर्वाधिक चिंता असते, ती अपघाताच्या परिस्थितीमध्ये होणाऱ्या आर्थिक जबाबदारीची. पूर्वीच्या कायद्यानुसार ऑपरेटरची नुकसानभरपाई जबाबदारी १५ अब्ज रुपये इतकी मर्यादित होती; परंतु पुरवठादारांविरुद्ध कारवाईच्या तरतुदींमुळे आंतरराष्ट्रीय कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास कचरू लागल्या. नवीन कायद्याने स्तरानुसार नुकसानभरपाई प्रणाली लागू केली आहे. मोठ्या रिॲक्टरसाठी ही मर्यादा ३० अब्ज रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे, तर लहान प्रकल्पांसाठी कमी मर्यादा ठेवण्यात आली आहे. याशिवाय स्वतंत्र अणुऊर्जा नुकसानभरपाई निधी तयार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. भारताने अणुऊर्जा विस्तारासाठी दीर्घकालीन योजना आखली आहे. सरकारच्या मते २०३१-३२ पर्यंत अणुऊर्जा क्षमता २२ गिगावॅटपेक्षा अधिक होऊ शकते. यासाठी देशांतर्गत विकसित ७०० मेगावॉट रिॲक्टर, आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रकल्प आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. याचबरोबर लघू मॉड्यूलर रिॲक्टर (एसएमआर) विकसित करण्यावरही सरकार भर देत आहे. या क्षेत्रात संशोधनाचे नेतृत्व 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर'सारख्या संस्थेकडे आहे. आज जगभर ऊर्जा संक्रमणाची प्रक्रिया सुरू आहे. सौर आणि पवन ऊर्जेचा विस्तार वेगाने होत असला तरी त्या स्रोतांची उपलब्धता हवामानावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत अणुऊर्जा स्थिर, कमी कार्बन उत्सर्जन करणारा आणि मोठ्या प्रमाणावर उपलब्ध ऊर्जा स्रोत म्हणून महत्त्वाची ठरते.भारताच्या ऊर्जा धोरणात अणुऊर्जेला आता नवी भूमिका दिली जात आहे, ती नवीकरणीय ऊर्जेची स्पर्धक नसून पूरक स्रोत म्हणून पाहिली जात आहे. 'शांती कायदा' लागू झाल्यानंतर अणुऊर्जा क्षेत्रात गुंतवणुकीच्या नवीन संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. खासगी कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी भारताचे अणुऊर्जा क्षेत्र अधिक आकर्षक बनू शकते. यामुळे नवीन प्रकल्पांची गती वाढू शकते. तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना मिळू शकते. देशांतर्गत उत्पादन आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळू शकते. या कायद्याचे यश केवळ कायदेशीर चौकटीवर अवलंबून राहणार नाही. काही महत्त्वाची आव्हाने अजूनही कायम आहेत. त्यात प्रामुख्याने अणुऊर्जा प्रकल्पांचा प्रचंड खर्च, स्थानिक लोकांचा विरोध, पर्यावरणीय चिंता, नियामक प्रक्रियेत होणारा विलंब यावर प्रभावी उपाययोजना केल्याशिवाय अणुऊर्जा विस्तार अपेक्षित गतीने होणे कठीण ठरू शकते. 'शांती कायदा २०२५' हा भारताच्या अणुऊर्जा धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. ऊर्जा सुरक्षा, हवामानबदल आणि आर्थिक विकास या तीन मोठ्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हा कायदा भविष्यातील ऊर्जा धोरणाची दिशा ठरवू शकतो. खासगी क्षेत्राचा सहभाग, नियामक संरचनेची बळकटी, गुंतवणूक सुलभता आणि तांत्रिक प्रगती या माध्यमातून अणुऊर्जा क्षेत्राला नवे आयाम मिळण्याची शक्यता आहे; मात्र या धोरणाचे खरे यश अंमलबजावणीवर अवलंबून राहणार आहे. योग्य नियोजन, पारदर्शक प्रशासन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा संगम साधला गेला तर भारताच्या ऊर्जा भवितव्यात अणुऊर्जा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरू शकते.कायद्यांचे एकत्रिकरणच नव्हे, तर अणुऊर्जा क्षेत्राच्या वाढीस अडथळा ठरणाऱ्या काही संरचनात्मक समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्नही या कायद्यात करण्यात आला आहे. त्यात सरकारी नियंत्रणाखाली असलेले संचालन मॉडेल, गुंतवणूक रोखणारी नुकसानभरपाईची जबाबदारी व्यवस्था, एका बंद, एकमेव ऑपरेटरवर आधारित नियामक रचना हे पूर्वी अडथळे ठरत होते. नवीन कायदा या सर्व बाबींमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. पूर्वी ऑपरेटरला दोषपूर्ण उपकरणांबाबत पुरवठादारांविरुद्ध थेट कारवाई करण्याचा अधिकार होता. यामुळे पुरवठादारांना मोठ्या जोखमीला सामोरे जावे लागत होते आणि अनेक परदेशी कंपन्या भारतात येण्यास कचरू लागल्या. नवीन कायद्यानुसार फक्त करारात नमूद असल्यास किंवा जाणीवपूर्वक चुकीचे कृत्य सिद्ध झाल्यास पुरवठादारांविरुद्ध कारवाई करता येईल. यामुळे भारताची कायदेशीर चौकट आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत करण्यात आली आहे. कायद्यात नवीन तक्रार निवारण यंत्रणाही तयार करण्यात आली आहे. यामध्ये अणुऊर्जा तक्रार सल्लागार परिषद, नियामक निर्णयांवर अपील करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण, नुकसानभरपाईसाठी विशेष दावा आयुक्त आणि दावा आयोग यांचा समावेश आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात २०० अब्ज रुपये लघू मॉड्यूलर रिॲक्टर (एसएमआर) विकसित करण्यासाठी देण्यात आले आहेत. २०३३ पर्यंत किमान पाच स्वदेशी 'एसएमआर' कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.'शांती कायदा २०२५' हा भारताच्या अणुऊर्जा धोरणातील महत्त्वाचा वळणबिंदू ठरू शकतो. कायद्यांचे एकत्रिकरण, खासगी क्षेत्राचा सहभाग, नुकसानभरपाई व्यवस्थेतील सुधारणा आणि नियामक संस्थेची बळकटी या माध्यमातून अणुऊर्जा क्षेत्राला अधिक सक्षम आणि विस्तारक्षम बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ऊर्जा सुरक्षेसोबतच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ आणि स्थिर ऊर्जेची गरज वाढत असताना हा कायदा भारताच्या ऊर्जा भवितव्यासाठी महत्त्वाची पायाभरणी ठरू शकतो.

**- प्रा. सुखदेव बखळे**